## प्रकरण चौथे

# म. द. हातकणंगलेकरांच्या ‘उघडझाप’ या आत्मपर आठवणी संग्रहाची वाङ्‌मयीन वैशिष्ट्ये.

पान क्र. ८९ ते ११९

## प्रकरण चौथे

# म. द. हातकणंगलेकर ‘उघडझाप’ या आत्मपर आठवणी संग्रहाची वाङ्‌मयीन वैशिष्ट्ये

४.१ प्रास्ताविक

४.२ आत्मपर कथानकाची निवेदन पध्दती

४.३ ‘उघडझाप’ मधील निसर्ग चित्रण

४.४ ‘उघडझाप’ मधील व्यक्तिरेखाटणे

४.५ ‘उघडझाप’ मधील प्रसंगचित्रण

४.६ ‘उघडझाप’ मधील विनोद

४.७ ‘उघडझाप’ मधील काव्यदर्शन

४.८ ‘उघडझाप’ मधील भाषाशैली

४.९ ‘उघडझाप’ मधील म्हणी व वाक्प्रचारांचे दर्शन

४.१० ‘उघडझाप’ इंग्रजी भाषा वापर

४.११ सारांश

## प्रकरण – चौथे

# म. द. हातकणंगलेकरांच्या 'उघडझाप' या आत्मपर आठवणी संग्रहाची वाङ्मयीन वैशिष्ट्ये.

### ४.१ प्रस्तावना :

या आधीच्या प्रकरणामध्ये आपण ज्येष्ठ समीक्षक प्रा. म. द. हातकणंगलेकर यांच्या ७५ वर्षांच्या प्रदीर्घ जीवनामध्ये आलेल्या व्यक्तिंच्या आठवणींचा अभ्यास केला. त्यामध्ये म.द. हातकणंगलेकरांच्या जीवनात आलेल्या व्यक्तिंची व्यक्तिमत्त्वे, त्यांच्या स्वभावाचे पैलू, स्वभावातील गुणदोष, व्यक्तिवैशिष्ट्ये, नातेसंबंधीच्या भावना या गोष्टींचा अभ्यास मांडलेला आहे. याबरोबर माणूस म्हणून जगत असताना त्यांच्या जीवनाभोवती सतत प्रवाहासारखे प्रवाहीत राहाणाऱ्या व्यक्तिंचा व लेखकांचा असलेला भावसंबंधही आपण अभ्यासलेला आहे. त्यामध्ये कुटुंबीय, आप्त, स्नेही, साहित्यिक, इ. व्यक्तिंचे जीवन त्यांच्या जीवनामध्ये कसे एकरूप झाले आहे या सर्व गोष्टींचा अभ्यास आपण 'उघडझाप' या ग्रंथाच्या आधारे अभ्यासला आहे.

प्रस्तुत प्रकरणामध्ये 'उघडझाप' या ग्रंथातील लेखनाची निवेदन पद्धती, भाषाशैली, निसर्ग, व्यक्तिवर्णन, प्रसंग वर्णन व 'उघडझाप' आत्मपर आठवणींच्या संग्रहासाठी लेखकांनी वापरलेल्या निवेदनशैलीचा अभ्यास करावयाचा आहे. या गोष्टीचा अभ्यास करीत असताना एका ज्येष्ठ समीक्षकाच्या 'उघडझाप' या ललित लेखनातील लेखनशैलीची वैशिष्ट्ये शोधण्याचा प्रयत्न करायचा आहे.

या पूर्वीच्या प्रकरणामध्ये म. द. हातकणंगलेकरांच्या जीवनाभोवती सातत्याने प्रवाहासारख्या फिरणाऱ्या काही मोजक्या व्यक्तिंच्या व्यक्तिरेखा स्पष्ट करण्याचा प्रयत्न केला आहे. कोणत्याही व्यक्तिंची व्यक्तिरेखा, त्यांचा स्वभाव, त्यांच्या ठिकाणी असणारे गुण-दोष, बाह्य वर्णनाबरोबर अंतरिक मनाचा ठाव घेणारी व्यक्तिची प्रतिमा साहित्यकारास आपल्या साहित्यातून वाचकासमोर साकारावी लागते. ही व्यक्तिरेखा किती प्रभावीपणे वाचकासमोर उभी करायची हे त्या लेखकाचे लेखन कौशल्य असते. या व्यक्तिंचा व्यक्तिभाव साकारण्यासाठी व लेखकास आपल्या मनातील विचार व्यक्त करण्यासाठी भाषा कोणती व ती कशी वापरायची? त्या निवेदनाची पद्धत कोणती

असावी या गोष्टीचा विचार लेखकास करावयाचा असतो. आपण ज्या व्यक्तिरेखा वाचकासमोर उभ्या करणार असतो त्यांना मूर्तरूप कसे प्राप्त होईल इत्यादी घटकांचा विचार करून साहित्यिकास आपल्या साहित्यकृतीतील निवेदनाची मांडणी करावी लागते. कारण अशा व्यक्तिचित्रणपर वाङ्मयाच्या प्रकारामध्ये 'निवेदन' हा घटक त्या लिखानाचे व्यवच्छेदक लक्षण बनलेले असतो. यामुळे लेखकाचे कथन, भाषाशैली, व्यक्तिरेखा, वाचकाच्या मनास भावत असतात. अशा साहित्यकृतीचे वाचन करीत असताना वाचक त्या व्यक्तिरेखेतील व्यक्तिंच्या जीवनाशी एकजीव होत असतो. त्या व्यक्तिंच्या चित्रणामध्ये तो आपले जीवन शोधून पाहत असतो. त्या व्यक्तिचित्रणामध्ये असणाऱ्या घटकापैकी शेवटी तो ही एक घटक होऊन जातो.

वाचकाच्या मनामध्ये असा आत्मियतेचा, एकरूपतेचा भाव निर्माण होण्यासाठी वापरण्यात येणाऱ्या लेखनाची लेखनशैली, लेखनाची ढब व्यक्तिगणिक बदलत असते. असे लेखनकौशल्य त्या-त्या लेखकाच्या लेखनशैलीत असावे लागते. प्रत्येक लेखकाचे लेखनकौशल्य, लेखनशैली वेगळी असल्याने ज्याची त्याची एक स्वतंत्र लेखनशैली निर्माण होत असते. या त्याच्या लेखनकौशल्याने, शैलीमुळे त्या साहित्यिकाची ओळख वाचकास होत असते. उदाहरनार्थ माडगुळकरांची शैली, फडके यांची शैली, खांडेकरांची शैली, नेमाड्यांची शैली, इत्यादी होय. प्रत्येक साहित्यिक आपल्या वेगळ्या लेखनशैलीने वाचकासमोर उभा राहात असतो. हीच शैली त्याचे 'ओळखपत्र' म्हणून वाचकाशी सुपरीचित होते. प्रस्तुत प्रकरणामध्ये आपणास म.द. हातकणंगलेकरांच्या 'उघडझाप' या ग्रंथाच्या वाङ्मयीन वैशिष्ट्यांचा, लेखनशैलीचा विचार करायचा आहे.

## ४.२ आत्मपर कथनाची निवेदन पध्दती

संवादाची भाषा जशी महत्त्वाची असते, त्याप्रमाणे निवेदनाच्या पध्दतीलाही तितकेच महत्त्व प्राप्त झालेले असते. 'आत्मकथनपर निवेदनामध्ये' निवेदकाच्या मनातील भाव वाचकास किती प्रभावित करू शकतात, हे त्या निवेदकाच्या भाषाशैलीवर अवलंबून असते. त्यामुळेच निवेदक आत्मकथनासाठी स्वतंत्र शैली तंत्राचा वापर करीत असतो. या स्वतंत्र शैलीतंत्राच्या माध्यमातून तो आपल्या मनातील भाव वाचकांच्या मनापर्यंत पोहोचण्याचे कार्य करीत असतो. या त्याच्या शैलीने त्याचे लेखन पुढे पुढे सरकावण्याचे व वाचकाशी संवाद साधण्याचे कार्य करीत असतो. असे निवेदन प्रवाहित राहण्यासाठी, एखादी घटना किंवा एखादा प्रसंग चित्रित

करण्यापूर्वी वातावरण निर्मितीची आवश्यकता असते. अशी वातावरणाची निर्मिती तो आपल्या भाषाशैलीच्या माध्यमातून निर्माण करीत असतो. यासाठी त्याला आपल्या निवेदनाच्या माध्यमातून कथनप्रसंगाभोवती सतत फिरत रहावे लागते. ग्रंथातील घटना, प्रसंग, वातावरण, व्यक्तिचित्रण इत्यादी सर्वच गोष्टीमध्ये एकसुसुत्रीपणा असावा लागतो. हा एकसुत्रीपणा, सुसंघटितपणा निर्माण करण्यासाठी लेखकास निवेदनशैलीचे सहाय्य आधारभूत ठरीत असते.

लेखकाचा आपल्या निवेदनातील घटना व व्यक्तिरेखा वाचकांच्या मनाच्या गाभाऱ्यापर्यंत पोहचवण्याचा प्रामाणिक प्रयत्न असतो. त्यासाठी तो प्रथमपुरुषी, तृतीयपुरुषी, पत्रात्मक, मनोविश्लेषणात्मक इत्यादी निवेदनशैलीचा वापर करीत असतो.

म. द. हातकणंगलेकरांनी 'उघडझाप' या 'आठवणी संग्रहाच्या' ग्रंथामध्ये 'प्रथमपुरुषी' निवेदनशैलीचा वापर केलेला आहे. अशा प्रथमपुरुषी निवेदनामध्ये म. द. हातकणंगलेकरांनी साधी, सरळ, ओघवती चित्ररूप भाषाशैली वापरलेली आहे. या प्रथमपुरुषी निवेदनातून म.द. हातकणंगलेकरांनी आपल्या जीवनाभोवती फिरणाऱ्या व्यक्तिंची व्यक्तिचित्रे रेखांकित केलेली आहेत. याच निवेदनाच्या माध्यमातून म.द. हातकणंगलेकरांनी आपल्या सहवासातील व्यक्तिंचे बहुरंगी रूप वाचकांसमोर साकारले आहे. अशा वेगवेगळ्या मनोवृत्तीचे त्यांना इतके आकर्षक आहे की, लेखकासोबत वाचकासही त्या व्यक्तिंच्या मनामध्ये डोकावता येते. हेच कौशल्य म. द. हातकणंगलेकरांनी 'उघडझाप' या ग्रंथाच्या माध्यमातून योग्यरित्या दाखवले आहे. आणि हेच त्या ग्रंथाचे लेखन मूल्य ठरते. हा ग्रंथ म्हणजे विविध व्यक्तिचित्रणाच्या माध्यमातून आपले 'जीवितकथन' उलघडण्याचा प्रयत्न असे सकृतदर्शनी वाटते. पण हे लेखन वाचताना वाचकास कथा, कादंबरी यासारखे ललितरम्य साहिंत्य वाचल्याचा आनंद मिळतो. हेच श्रेय त्यांच्या निवेदन शैलीस द्यावे लागेल.

'उघडझाप' या ग्रंथामध्ये हातकणंगलेकरांनी जी 'प्रथमपुरुषी' निवेदनाची भाषाशैली वापरलेली आहे. त्यास 'आत्मकथनपर निवेदन' असे ही म्हणतात. आपल्या आत्मकथनपर निवेदनशैलीमध्ये निवेदक 'मी' या सर्वनामाचा वापर करून आपले 'जीवितकथन' सुजान अशा वाचकासमोर नेटकेपणाने उभे करीत असतो. आणि त्यामध्ये म.द. हातकणंगलेकर यशस्वी झालेले आहेत.

## ४.३ 'उघडझाप' मधील निसर्गचित्रण

'उघडझाप' हा म.द. हातकणंगलेकरांचा ग्रंथ अभ्यासत असताना बालपणापासून त्यांच्या मनामध्ये असणारी निसर्गाविषयीची अतृप्त ओढ दिसून येते. बालपणापासून पाहिलेला व डोळ्यांच्या कडामध्ये मनाच्या गाभाऱ्यामध्ये प्रतिबिंबित झालेला निसर्ग या ग्रंथामध्ये घटना प्रसंगाच्या निमित्ताने ठाई ठाई आढळून येतो. निसर्गाचे येणारे चित्रण चित्रमयपणे या ग्रंथातून वाचकासमोर उभे राहते. या लेखनवैशिष्ट्यामुळे लेखकांनी अनुभवलेला, पाहिलेला निसर्ग वाचकासमोर ते उभा करू शकतात. हे लेखनकौशल्य त्यांच्या लेखनीत सामावलेले आहे. हा निसर्ग या ग्रंथातील व्यक्तिपासून अलग करता येत नाही. 'निसर्ग' व 'व्यक्ती' हे दोन्ही घटक एकरूपपणे अखंड प्रवाहासारखे प्रवाहीत होत राहाताना दिसतात. म्हणून व्यक्तिचित्रण वेगळे व निसर्गचित्रण वेगळे काढता येत नाहीत. त्यांचे एक अतूट असे नाते निर्माण झालेले दिसून येते. हेच या ग्रंथातील निसर्गचित्रणाचे वेगळेपण म्हणता येईल. 'उघडझाप' या ग्रंथामध्ये येणारे प्रसंग घटना किंवा व्यक्ती रेखा चित्रित करताना या ग्रंथामध्ये येणाऱ्या निसर्गामुळे त्या अधिक परिणामकारक ठरतात. हा भाग इथे महत्त्वाचा वाटतो.

'उघडझाप' या ग्रंथामध्ये वेळोवेळी येणारा निसर्ग हा म.द. हातकणंगलेकरांनी प्रत्यक्ष अनुभवलेला आहे. बालपणापासून ते वयाच्या ७५ वर्षापर्यंत म.द. हातकणंगलेकरांचे वास्तव ज्या ज्या ठिकाणी झाले त्या त्या ठिकाणचा निसर्ग प्रसंगानुरूप त्यांनी चित्रित केला आहे. निसर्ग व निसर्गाची नानारूपे, क्षणाक्षणाला निसर्गामध्ये होणारा बदल हा म.द. हातकणंगलेकरांच्या डोळ्यामध्ये आजही बंदिस्त आहे. तोच बंदिस्त असलेला निसर्ग हुबेहूब त्यांनी साकारलेला आहे. मग हे चित्रण अचानक आलेल्या वळवाच्या पावसाचे असो, पावसाळ्यामध्ये तुडुंब वाहणाऱ्या ओढ्याचे असो, रात्रीच्यावेळी वस्तीला गेल्यावर क्षणाक्षणाला बदलणाऱ्या निसर्गाची नाना रूपे असतील किंवा क्रिकेट खेळण्यासाठी माळरानावर गेल्यानंतरचा प्रत्ययास येणारा संध्याकाळचा निसर्ग असो, अशी अनेक निसर्गाची रूपे योग्य प्रसंगानुरूप ते चित्रित करतात. अशी निसर्गाची चित्रे वाचकासमोर उभी करताना त्यांना लेखनाची कसरत करावी लागत नाही. ती सरळ, साध्या भाषेमध्ये ओघवतेपणी या ग्रंथाच्या माध्यमातून वाचकासमोर साकारतात. अशी निसर्गाची रूपे वेगवेगळ्या 'रुपकां'चा वापर करून म.द. हातकणंगलेकरांनी साकारलेली आहेत.

संध्याकाळच्या रमणीय वातावरणामध्ये दिसणारा निसर्ग किंवा उन्हाळ्याच्या दिवसामध्ये माळरानावरती क्रिकेट खेळायला गेल्यानंतर सूर्य मावळत असताना त्याच्या सोनेरी किरणामुळे जो अचानक माळरानाच्या सौंदर्यामध्ये बदल होतो तो म.द. हातकणंगलेकरांनी अक्षरबद्ध केलेला आहे. ते लिहितात, ''संध्याकाळच्या उन्हात खुरट्या गवताची पाती पिवळ्या रंगात न्हाऊन निघाली होती. वातावरण उल्हासित होते.'' [१]

तर रात्रीला रानामध्ये वस्तीला गेले असता आसमंतामध्ये निर्गाची जी भयावह रूपे म.द. हातकणंगलेकरांच्या डोळ्यासमोर उभी राहातात. त्या वेळच्या निसर्गाचे पर्यायाने अंधाराचे चित्रण करताना ते लिहितात,

''अंधार झाला, रात्र पडली, रानातला अंधार काही वेगळाच वाटला अंत नसलेला भयकारी.'' [२]

''सौम्य संध्याकाळ, रस्त्यावर नि:शब्द छायासारख्या हालचाली सुरू होत्या.'' [३]

''समोरचे बार्ली कापलेले विस्तीर्ण रान सोनेरी झाले होते.'' [४]

रात्री वस्तीला गेले असताना मध्यरात्री जाग आल्यानंतर त्यांच्या डोळ्यासमोर उभ्या असणाऱ्या आकाशछायेचे वर्णन करताना ते लिहितात,

''रात्री कधीतरी जाग येई. गारवा वाढलेला असे. आजूबाजूची माणसे गाढ झोपेत असत. वरच्या विरळ छपरातून चांदणे, चंद्र दिसे. पांढरे विस्कटलेले ढग त्यावरून सरकत. त्याच्याकडे पाहाताना एकाग्रता होऊन पुन्हा झोप लागे. रानातल्या वातावरणातील ती झोपेची अवस्था वेगळी, ध्यानस्थ अनुभव देणारी असे.'' [५]

असे बदलत राहाणाऱ्या निसर्गरूपांच्या सोबत त्यांचे बालपण सरलेले आहे. आनंदाने मागे सरलेल्या जीवनाकडे कलत्या सांजेच्या वेळी उभे असताना त्यांच्या मनामध्ये या भूतकालीन आयुष्याबद्दल विचार येतो. 'ते श्रेय आता हरपले ते हरपलेच.'

आयुष्याच्या कलत्या सांजवेळी लिहिलेले हे आठवणींचे कथन आपणास या निसर्गचित्रणामुळे पन्नास-साठ वर्षापूर्वीच्या निसर्गाशी एकरुप करते. पन्नास-साठ वर्षापूर्वीच्या निसर्गाशी, व्यक्तिशी, व्यक्तिजीवनाशी वाचक समरूप होतो. आणि अंर्तमुख होऊन जातो. एका

ठिकाणी ते लिहितात, ''सत्तेचाळीस-अठ्ठेचाळीसच्या सुमारास मी सांगलीहून बेळगावला अनेकदा जात असे. ते टुमदार गाव मला जिव्हाळ्याने भरल्यासारखे वाटते. तांबड्या मातीची किनार असलेले वळणावळणाचे डांबरी रस्ते, त्याच वर्णाची बैठी घरे, गावाशेजारी असलेली भाजीपाल्याची गच्च हिरवी राने, सावलीदार वृक्षांनी विनटलेली मोकळी मैदाने, झाडीत लपलेल्या सुखासीन, सुस्त दर्शनाचे जुन्या थाटाचे बंगले असलेली टिळकवाडीची वस्ती त्या आधीच्या रहस्यमय लष्करी वस्तीचा आवाहक परिसर. तृप्त माणसांच्या संथ, शांत हालचाली. फुलांची, वेण्यांची, तजेलदार चेहऱ्याची बाजारपेठेतील गजबज, गाव शेजारून वळणे घेत जाणारा नितळ रस्ता.''[६]

हे बेळगावचे पन्नास-साठ वर्षापूर्वीचे वर्णन वाचत असताना आपणच त्या वाटेवरून चालत चाललो आहोत असा भास वाचकाच्या मनामध्ये निर्माण होतो.

परिवर्तन हा निसर्गाचा नियम आहे. मग तो मानव असो, प्राणी असो निसर्गाच्या नियमानुसार त्याला बदलावे लागतेच. तसाच बदल हा निसर्गाच्या प्रकृतीमध्ये ही घडत असतो. हा निसर्गामध्ये होणारा बदल शब्दरूपामध्ये बंदिस्त करणे कठीणच? असे असले तरी निसर्गाची ही बदलणारी नाना रूपे म.द. हातकणंगलेकरांना वश झाली आहेत असे वाटते. असाच पावसाचा अनुभव त्यांनी आपल्या लेखनीने बंदिस्त केलेला आहे. पुढील वर्णनातून आपणास ते दिसून येते. ''निघताना स्वच्छ झगझगीत सूर्यप्रकाश... थोड्या वेळात सारे आभाळ भरून आले, आणि जोरदार पावसाला सुरूवात झाली. खिडक्याचे पडदे काही ठिकाणी नीट बसत नव्हते. त्यामुळे ते सटासट खिडक्यावर आपटत होते. आणि पावसाचे शिंतोडे आत उघड होते. गारवा पसरत होता, बाहेर काळोख वाढतच होता... ओढ्याचा आवाज येत होता.''[७]

असाच अनुभव त्यांना पुन्हा एकदा प्रत्ययास येतो. त्याचेही वर्णन म.द.हातकणंगलेकर आपल्या शब्दात पुढीलप्रमाणे करतात.

''रविवारची दुपार. आभाळ भरून आलेले. वातावरण दबा धरून बसल्यासारखे स्तब्ध होते. टेकडीवरच्या उतारावर पूर्वेच्या बाजूला एक तळ्यासारखा जलाशय तयार झाला होता. त्याचे पाणी अत्यंत तटस्थ दिसत होते. कसलीच हालचाल नव्हती. आभाळात काळे, करडे ढग मात्र एकमेकावर चढत होते. आणि थोड्या वेळात वातावरण हलू लागले. दूरवर पावसाचा एक विशाल पडदा खाली सुटला. वाऱ्याबरोबर झुलू लागला. कुठे गडद, कुठे विरळ होऊ लागला.

जलाशयाच्या पृष्ठभागावर चंचलता अवतरली. लाटांच्या घड्या दिसू लागल्या. आक्रमण करणाऱ्या पावसाला कवेत घेण्यासाठी त्या उचंबळू लागल्या. इतक्यात ओतप्रोत ढगाचे ओघळते झुंबर त्या जलाशयावर फुटले आणि धारांची एकच तन्मय बरसात सुरू झाली.'[८]

शेती हा विषय जसा त्यांच्या वडिलांचा जिव्हाळ्याचा विषय होता, तसाच तो लेखक म.द. हातकणंगलेकरांच्याही जिव्हाळ्याचा विषय आहे. हातकणंगले गावामध्ये त्यांचे बालपण सरले. बालपणातील त्यांचा काळ शेती किंवा शेतीशी संबंधीत घटकांमध्ये व्यतीत झालेला आहे. मग तो मळ्यातील वस्तीचा प्रसंग असो. पाणमळ्यातील पाटामधून खळाळत वाहणाऱ्या पाण्याचा प्रसंग असो. आजही त्यांना तो प्रसंग साद घालताना दिसतो. त्या काळी त्यांनी अनुभवलेला तो आनंद ते प्रसंगानिमित्ताने वाचकापर्यंत पोहचवतात.

'पानमळ्याच्या एका बाजूला बांधावरून पाण्याचा पाट काढलेला होता. त्याच्या उताऱावर मातीत झोपले आणि जमिनीवर कान लावला की आतून वाहाणाऱ्या पाण्याच मंद, सुरेल आवाज कानातून डोक्यात वाहत राहायचा. तो ऐकत असताना अवघी जाणीव नादमय होऊन जायची. दूर पाटाच्या सुरूवातीच्या डोहात ठरावीक वेळाने मोट उपडी व्हायची आणि मंद लयीत खळाळ निर्माण व्हायचा. व पुन्हा लयीची धार वाहू लागायची.'[९]

याच पाटाच्या पाण्यात खेळत-बागडत त्यांचे बालपण सरले होते. वाहाणाऱ्या पाटाच्या पाण्याबरोबर शेतमळ्याचेही वर्णन त्यांच्या नजरेमध्ये सामावलेले आहे.

'दोन्ही बाजूला लांबवर पसरलेली शेती. कापणी झाल्याने एकसारखे पिवळे पडलेले खुंट अगर गवत. त्यात विसावलेल्या मोजक्याच गाई, विस्तृत शेतांना वेडणारी काळपट, हिरवी गच्च झाडे आणि पुन्हा शेताचा विस्तार. त्यात लहान आकाराचे अटोपशीर शेतबंगले, भोवती ट्रॅक्टरसारखी एकदोन अवजारे. हे जडवलेले अखंड दृश्य.'[१०]

म.द. हातकणंगलेकर यांच्या 'उघडझाप' या ग्रंथामध्ये निसर्ग हा कधीही एकटा अवतरलेला नाही. त्याच्या सोबत शेतातील घरे, गडीमाणसे, जनावरे, बागा, फुलझाडे, यांच्यासोबतच तो उभा राहात असतो. याच शेती-शेतगड्यांच्या संबंधीत असणारा व लेखकांच्या जिव्हाळ्याचा असणारा घटक म्हणजे 'गुऱ्हाळ' होय. या गुऱ्हाळासंबंधी गुरफटलेल्या अनेक घटना, प्रसंग, गूळ तयार करण्याची पद्धत या गोष्टी त्यांच्या मनाला अतृप्त असे समाधान देऊन जातात. ते लिहितात,

" गुळवे हा शब्द मला आवडतो. एक वेगळेच जग या ठिकाणी ते उभे करतात. दर वर्षी मळ्यात ऊसाचे गुऱ्हाळ होई. ते दहा–बारा दिवसतरी चालत असे. हे मी पाहत असे. दिवसा मी तिथे जाऊन बसे. विटांचे चुलवाण, धगधगता जाळ, त्यात सारण्यासाठी येणारे पाचोळ्याचे जळण, वर चढवलेली काळी झालेली काईल. रस ओतण्यासाठी केलेला लाकडी पट्ट्यांचा हौद . ऊसाचा सपासप फन्ना उडवणारे कोयते. कामाचा अनुभव असलेली अर्धनिष्णांत मंडळी." [११]

असे हे 'गुळव्यामधील' वर्णन वाचकालाही म.द. हातकणंगलेकरांबरोबर एक अनोखा अनुभव प्रत्ययास आणून देतो.

निसर्ग म्हणजे साक्षात 'स्वर्ग'च असतो. अशी स्वर्गीय ठिकाणे पाहिली, की लेखकाचे मन तृप्त होऊन जात असे. अशा रमणीय, मन रिझवणाऱ्या ठिकाणांचा जो अनुभव लेखकाना आलेला होता तो या ग्रंथातून वाचकासमोर ते उभा करतात. अशी ठिकाणे गरीबासाठी महाबळेश्वर, काश्मिरपेक्षा काही कमी वाटत नव्हती. तोच त्यांना आलेला प्रत्यय, अनुभव आणि त्यातून मिळणारा आनंद या चित्रणातून आपणास मिळतो.

"त्यावेळी सांगलीच्या आसपास अशी थंडाव्याची ठिकाणे बरीच होती. गावाच्या कडेला अंबराई होती. हरिपूरच्या वाटेवर चिंचेचे दाट बन होते. पुलाच्या खाली सांगलवाडीनजीक खाडिलकरांचे दत्त मंदिर आणि मळा होता. घाटाजवळ मंद झुलणाऱ्या हिरव्यागार गवताचे कुरण होते. डोळे आणि मन निववणारी अशी ही ठिकाणे. तात्यासाहेबांचा मळा हा त्यातला कौस्तुभच होता. एका बाजूला पेरूची बाग आणि दुसरीकडे नारळांची उंच डोलणारी झाडे कडेला पाटाचे पाणी, केळीची लागवड, खालची जमीन काळी करंद, स्वच्छ केलेली. त्यातून नाजूक पदन्यास करत झळाळणाऱ्या निळ्या रंगाचे मोर, मोठमोठ्या कवडशातून हिंडणारे."[१२]

अशा निसर्गमय वातावरणात रममाण होताना शरीराला बोचणाऱ्या थंडीचे चित्रण त्यांनी एके ठिकाणी केले आहे.

"भणाणणारा थंड वारा सुटला होता आणि माझ्या देहाचा थरकाप आवरणे अशक्य होते." [१३]

अशा निसर्गाच्या रमणीय वातावरणामध्ये लेखक विरघळून जायचे. त्यांना कधी–कधी सरलेल्या वेळेचे भानही राहात नसे. मातीचा स्पर्श झाल्यापासून त्यांच्या मनामध्ये मातीच्या

कणाची जाणीव घट्ट झालेली दिसते. याच मातीमध्ये विरघळून जाणाऱ्या वेळेविषयी ते लिहितात,

"मऊ मातीत रेलून त्याकडे पाहत असताना उन्हे कधी मंदावली हे ध्यानात यायचे नाही."[१४]

म.द. हातकणंगलेकरांनी निसर्गाची प्रत्ययास येणारी नाना रूपे, निसर्गाची मग्नता, जितका वेळ शाबूत ठेवता येईल, तितकावेळ शाबूत ठेवण्याचा प्रयत्न केलेला आहे. अशा निसर्गाच्या विविध रूपामध्ये बुडून निघाल्याने मनाला आलेला श्रांतपणा आजही तीन तपानंतर त्यांना आठवतो. कुलकर्णी व लेखक यांची भेट झाली ती अर्थघन वातावरणात. तो प्रसंग लेखकांना तपशीलासह स्मरतो. ते लिहितात, "सौम्य संध्याकाळ, रस्त्यावर नि:शब्द छायांसारख्या हालचाली. चित्रपटगृहाचे नीटस आवार. व्हरांड्यात माखलेले तांबूस मैदान, कडेला फवाऱ्यासारखी व चढलेली काळसर झाडे, त्यामधून सरकणारे जनावरांचे गोठलेले ठिपके. खोल पाण्यातील बुडबुड्याप्रमाणे शांततेच्या पृष्ठभागावर फुटणारे आवाज." [१५]

अशा निसर्गचित्रणामध्ये आंबराई, पाणमळा, हिरवे गवत, माळरान, घरे, शेतमळा, गुरे, सूर्याची किरणे, खळाळणारा ओढा या व यासारख्या असंख्य गोष्टी त्यांच्या मनामध्ये आजही घर करून आहेत. मनाच्या खिडकीचे दार किलकिले करून या सर्व निसर्गरूपांचा आस्वाद 'उघडझाप' या ग्रंथामधून म.द. हातकणंगलेकर यांनी रसिकांना दिलेला आहे.

## ४.४ 'उघडझाप' मधील व्यक्तिरेखाटणे

'उघडझाप' हा म.द. हातकणंगलेकरांचा आत्मपर आठवणींचा संग्रह आहे. या आठवणींच्या संग्रहामध्ये म.द. हातकणंगलेकरांनी अनेक व्यक्तिंचे स्वभाव त्यांच्या गुणदोषासहीत स्पष्ट केलेले आहेत. या व्यक्तिरेखा 'उघडझाप' या ग्रंथामध्ये एकट्या अवतरत नाहीत. प्रत्येक व्यक्तिंच्या सोबत या ग्रंथाचे लेखक म.द. हातकणंगलेकर हे उभे असलेले दिसतात. म्हणजे म.द. हातकणंगलेकर हे अनेक 'मी' मधील मिसळून गेलेले एक 'मी' आहेत असे या ग्रंथाचे वाचन करताना वाटते. या आठवणीसंग्रहामध्ये आपल्या जीवनाभोवती फिरणाऱ्या व्यक्तिरेखांचे वर्णन त्यांच्या गुण-दोषासहीत स्पष्टपणे साकारलेले आहे. यामुळे माणसामाणसांमध्ये असणारी विविधता, विचारांमध्ये असणारा फरक या व यासारख्याच अनेक गोष्टीचा नकळतपणे उलघडा

होत जातो. ही व्यक्तिचित्रणे वाचत असताना त्या व्यक्तिंची प्रतिमा वाचकाच्या डोळ्यासमोर उभी करण्याचे कौशल्य म.द. हातकणंगलेकरांच्या लेखनीमध्ये आहे. हेच त्यांच्या व्यक्तिचित्र रेखाटणाचे वैशिष्ट्य म्हणता येईल. या व्यक्तिरेखामध्ये विषेशत: वडील, भाऊ, आत्या, शिक्षक, मित्र, साहित्यिक इत्यादींची व्यक्तिचित्रणे म.द. हातकणंगलेकरांनी रेखांकित केलेली आहेत.

म. द. हातकणंगलेकरांच्या डोळ्यासमोर आजही त्यांच्या वडिलांची मूर्ती उभी राहाते. अल्पकाळामध्ये वडिलांकडून मिळालेल्या अनमोल अशा संस्काराचा ठेवा वाचकासमोर ते रिता करतात. त्यांच्या बालमनावर वडिलांची कोरलेली मूर्ती त्यांच्या या आठवणीतील लेखांच्या संग्रहातून वाचकांसमोर स्पष्टपणे उभी राहते. वडिलांच्या वागण्यातील, विचारातील, परोपकारी वृत्तीचा भाव लेखकांला अभिमानाचा वाटतो. तोच वडिलांच्या बद्दल वाटणारा आकर्षक भाव ते या आठवणीच्या संग्रहातून व्यक्त करतात. आपल्या वडिलांचे असे वेगळे व्यक्तिमत्व इतरापेक्षा कसे भारदस्त आहे याची तुलना आपल्या मोठ्या भावाबरोबर ते करतात. या तुलनेतून वडील कसे इतरापेक्षा सर्वच गोष्टीमध्ये सरच, श्रेष्ठ ठरतात ते वाचकासमोर मांडतात.

'माझे वडील आणि भाऊ दोघांचे व्यक्तिमत्व आकर्षक होते. या आकर्षकपणाच्या दर्शनात एका पिढीचा फरक होता. तो पोषाखाचा होता, अभिरूचीचा होता. वर्तनाच्या आविष्काराचा होता. दादांचे व्यक्तिमत्त्व केवळ आकर्षक नव्हे तर रूबाबदारही होते. सहा फूट उंची, धारदार नाक, भरघोस मिशा, तांबूस गोल वर्ण, चेहऱ्यावर खानदानी तेज, भाऊ बऱ्यापैकी उंच पण दादापेक्षा कमी, त्यांची कुणालाही जरब वाटली नसती आणि नाही. राजबिंडेपणा आणि मोहकता असा फरक करता आला असता. दादांचे शिक्षण फार झाले नसले तरी बुद्धी कुशाग्र होती. दृष्टी चौफेर होती. एकांगी नव्हती. दादा कर्तबगार पुरूष वाटायचे. आण्णा नुसता सरळमार्गी, हटवादी आणि रसिक वाटायचा.''[१६]

लेखकांच्या व्यक्तिमत्त्वावर जसा कुटुंबियांचा प्रभाव आहे, तसाच त्यांनी ज्या ज्या शाळेतून आपले शिक्षण पूर्ण केले त्या शाळेतील शिक्षकांच्या व्यक्तिमत्त्वाची ही छाप लेखकांच्या मनावर पडलेली दिसते. अशा शिक्षकांचेही व्यक्तिचित्रण त्यांनी आपल्या ग्रंथातून साकारलेले आहेत.

हातकणंगले या गावामध्ये असताना शिकवणीसाठी ते एका शिक्षकाकडे जात होते. त्या शिक्षकांचे जिवंत चित्र त्यांनी रेखाटले आहे.

'त्यांची मूर्ती ठेंगणी होती. शरीर सदृढ होते. डोक्यावर दाट, काळेभोर मागे फिरवलेले पण वारंवार पुढे येणारे केस होते. घोट्याच्या वर येणारे, समोर पट्टीदार निऱ्या सोडलेले धोतर ते नेसत. पांढरा हाफ शर्ट, डोक्यावर काही नाही. मास्तर बेताचे पान खात.' [१७]

सांगली हायस्कूलमध्ये शिक्षण घेत असताना अनेक शिक्षकांचा सहवास त्यांना लाभला. त्यापैकी मराठी, इंग्रजी शिकवणाऱ्या शिक्षकाचे रूप त्यांना आठवते, ते त्यांनी हुबेहुब वाचकासमोर साकारले आहे.

'आणखी एक शिक्षक आठवतात, ते काळेसावळे पण दुसऱ्यावर छाप पाडणारे त्यांचे व्यक्तिमत्त्व होते. मागे टाकलेले केस, रेखीव चेहरा, काडीचा चष्मा, कोट (त्या काळी सारेच शिक्षक कोट घालत. दत्तोपंत कधी कधी पांढरा स्वच्छ हाफ शर्ट घालत) समोर पट्टी सोडलेले बंगाली पद्धतीचे धोतर, त्यांचा विषय अर्धमागधी असला तरी ते आम्हाला मराठी, इंग्रजी शिकवत.'[१८]

कोल्हापूरच्या ख्रिश्चन शाळेत शिकताना त्या शाळेतील प्रिन्सिपाल विषयी ते लिहितात, त्याकाळातील 'कोल्हापूरच्या ख्रिश्चन शाळेतील प्रिन्सिपाल स्ट्रेलर नावाचे अमेरिकन गृहस्थ होते. ते शिडशिडीत अंगाचे खूप उंच गृहस्थ होते. त्यांचे डोळे निळेभोर होते. लांब टांगा टाकत ते शाळेच्या आवारात फिरत. ते इंग्रजी-मराठी मिश्र पद्धतीने बोलत. त्या गोष्टीचे हसू सर्व विद्यार्थ्यांना येत असे. त्यांनी चिमणीवर एक चिमुकली कविता तयार केली होती. ती कविता ते सर्व विद्यार्थ्यांना वाचून दाखवत होते. त्या कवितेचा त्यांना अभिमान वाटत होता.

'चिमणी सुखी रमनी
गेली उडोनी' [१९]

अशी कविता ते विद्यार्थ्यांना वाचून दाखवत आणि आपले डोळे मिचकावत व छान हसत.

शिक्षकांच्या वर्तनावरून, त्यांच्या बोलण्यातून, हावभावामधून त्यांची वेगळी अशी प्रतिमा विद्यार्थ्यांच्या मनामध्ये निर्माण होत असते. अशाच काही शिक्षकाविषयीच्या प्रतिमा म.द. हातकणंगलेकर व त्यांचे वर्गमित्र यांच्या मनामध्येही निर्माण झालेल्या आहेत. त्या प्रतिमा म्हणजे त्या शिक्षकांच्या गुणा-अवगुणांचे साक्षात दर्शनच. काही शिक्षकाविषयीची व्यक्तिचित्रे रेखाटताना त्यानी त्यांचे स्वभाव दाखविले आहेत. पण म.द. हातकणंगलेकरांच्या मनामध्ये त्या

शिक्षकाविषयी कटुतेचा भाव होता असे नाही. अशी काही व्यक्तिचित्रे एक समिक्षक म्हणून म. द. हातकणंगलेकरांनी निर्हेतूकपणे मांडलेली आहेत. त्याची काही उदाहरणे पुढीलप्रमाणे,

'शारीरिक शिक्षण शिकवणारे शिक्षक खडूस होते. त्यांना मुलांबद्दल प्रेम नव्हते. विषयाची आस्था नव्हती. मराठी शिवणारे मास्तर गिड्डे गुटगुटीत पांढऱ्या दाढीच्या खुटांचे गृहस्थ होते. त्यांना मुले 'बटाटा' म्हणत. इंग्रजी शिकवणारे काटकुळे मास्तर 'इसब' झालेले होते... गणित शिकवणाऱ्या मास्तरांना मुले 'गांजाकस' म्हणत. ते गबाळे, दाढी वाढवलेली त्रासिक चेहऱ्याचे गृहस्थ होते. ते प्रत्येकाला, ''देऊ का मुस्काटात? असे म्हणत.' [२०]

काही वेळेस म.द. हातकणंगलेकरांनी केलेल्या व्यक्तिंच्या बाह्य वर्णनावरून त्या व्यक्तिंच्या अंतरिक मनाचेही दर्शन आपसूकपणे वाचकांच्या प्रत्ययास येते. असाच प्रत्यक वाचकास जी.ए. च्या आठवणी वाचताना येतो.

'त्यावेळी ते स्कूटर वापरीत असावेत. अगोदर सायकल. त्यांचा पोषाख नेहमी नीटनेटका असे. पायात सॉक्स, बूट, केसांचा चोपून भांग पाडलेला, कॉट्सवूलनचे बुशशर्ट निवडक शांत रंगाचे असत. कसलाच भडकपणा जाणवत नसे. सायकल वापरीत तेव्हा पायाला घट्ट बसणाऱ्या क्लिपा असत. डोक्यावर सोलो हॅट आणि त्याला पोपटी रंगाचे प्लॅस्टिकचे कव्हर, ते आवश्यक असे.'[२१]

याबरोबरच त्यांनी त्यांचे लेखकमित्र जी.ए. कुलकर्णी यांची व्यक्तिरेखाही मोजक्या शब्दात रंगवली आहे.

''इतक्यात हलक्या पावलांनी जवळ कुणीतरी येऊन उभे राहिले. सर्वसाधारण उंची, अतिशय टापटिपपणा पण फार आधुनिक नव्हे असा पाश्चात्य पोशाख, रूंद आडवा चेहरा, जाड भिंगाचा चष्मा, त्याआडचे सावध, संथ डोळे, मधोमध भांग असलेले, चापून बसवलेले भरगच्च केस, रूंद जिवणी, सिगारेटचा मुरलेला वास, हळू आवाजात बोलणे सुरू झाले. ते जी.ए. कुलकर्णी होते. हे काही वेळाने स्पष्ट झाले.'' [२२]

म.द. हातकणंगलेकरांच्या लेखनाचे आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे, त्यांची लेखनशैली मानवी मनाचे प्रत्ययकारी दर्शन घडवते. मग ते मन प्रेमळ असो, साधेभोळे असो किंवा व्यावहारिक

वृत्तीचे असो. अशी जी व्यवहारवृत्ती मोठ्या मामांच्या व्यक्तिमत्वामध्ये सामावलेली होती. त्याचेच वर्णन ते करतात. त्या वर्णनावरून मोठ्या मामांचा व्यवहारी स्वभाव वाचकासमोर उभा राहतो.

'त्यांची कोणतीही वृत्ती निर्हेतूक नसे. त्यात दीर्घ मुदतीचा स्वार्थ आणि परोपकार यांची सांगड असे.' [२३]

या छोट्या छोट्या वाक्यांच्या निवेदनात म.द. हातकणंगलेकरांच्या लेखनात अधूनमधून आढळणाऱ्या मिस्किल छटेचाही वाचकाला प्रत्यय येतो.

म.द. हातकणंगलेकरांच्या लेखनाचे आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे, त्यांनी आपल्या 'उघडझाप' या ग्रंथामध्ये ज्या व्यक्तिरेखा रेखाटलेल्या आहेत. त्या व्यक्तिरेखांच्या माध्यमातून त्यांचे बाह्यवर्णन, आंतरिक मनाचे वर्णन, त्यांचा स्वभाव, त्यांच्या स्वभावातील गुण-दोष, त्यांचे वागणे इत्यादी गोष्टींचे प्रत्यकारी दर्शन घडते. त्याबरोबरच त्या व्यक्ती ज्या परिस्थितीमध्ये, वातावरणामध्ये जगत असतात त्याचेही दर्शन लेखकांची लेखनशैली दाखवून देते. त्या व्यक्तिच्या चित्रणातून त्या व्यक्तिच्या वाट्याला आलेले सुख-दुःख वाचकासमोर ते उभे करतात. असेच सुख-दुःख मिश्रीत जीवन 'जनी' च्या व्यक्तिचित्रणातून लेखक आपणासमोर साकारताना लिहितात,

"आमच्या गटात एक शेजारची मुलगी येऊन बसत असे. ती मला मुलखावेगळी वाटायची. फार आवडायची. तिचे नाव जनी. शेजारच्या कुटुंबातील ती सहा-सात वर्षांची मुलगी. कुटुंब गरीब म्हणून तिचे परकर पोलके फाटलेले. पण दिसायला इतकी निष्पाप आणि देखणी. सर्वप्रकारचे अनाघ्रात. हे मी काय शब्द वापरतो आहे? तिला तिचा स्पर्शही होणे कठीण होते. आम्ही शेकोटी पेटवली की तिला हाक मारत असू. ती आपला परकर सावरत आमच्यापुढे येऊन बसे. तिचे पिंगट भुरे केस वाऱ्यावर उडत. त्यात शेकोटीच्या काळसर काड्या पडत. तिचा रंग गाजरासारखा तांबूस, ताजा होता. शेकोटीच्या प्रकाशात त्यावर निराळी कांती चढे. हातावरची लव सोनेरी दिसे. तिचे डोळे घारे होते. पापण्या पिंगट आणि दात एका ओळीत पांढरे शुभ्र. ती अधूनमधून हसत असे. फारशी बोलत नसे." [२४]

म. द. हातकणंगलेकरांच्या जीवनामध्ये आलेल्या व्यक्ती जशा सालस, लाजऱ्या आहेत तशाच त्या रांगड्या वृत्तीच्याही आहेत. हा रांगडेपणा फक्त पुरुषी व्यक्तिचित्रणामध्ये अवतरला आहे असे नाही तर तो काही 'स्त्री' व्यक्तिचित्रणाच्या माध्यमातूनही वाचकासमोर येतो. अशा

रांगड्यावृत्तीच्या, पुरुषीवृत्तीच्या विचाराचे व्यक्तिमत्त्व 'स्त्री'मध्ये कसे सामावलेले आहे ते फारच संयतपणे, लेखक म.द. हातकणंगलेकर यांनी मांडले आहे. ते पुढीलप्रमाणे,

"आणखी एक वृद्धा मला आठवते. तिला वृध्दा म्हणणे कठीण होते. कारण ती एका बेदरकार, कणखर गड्यासारखी वावरत असे. पुरुषांच्या कोंडाळ्यात ती दिसत असे. मानेवर गड्यासारखी काठी टाकून आणि गुडघ्याखाली येणारी दुटांगी लुगडे नेसून ती दणकट पावले टाकत पुरुषासारखी चालत असे. ती शेतात गड्याप्रमाणे काम करी. शेतकामापेक्षा मोट चालवणे तिला आवडत असे. मोटेची धष्टपुष्ट जनावरे ती आत्मविश्वासाने राबवत असे." [२५]

'स्त्री' स्वत:चे निसर्गदत्त गुणधर्म विसरून कधीकधी परिस्थितीवर मात करते. हातकणंगलेकरांनी स्वत:च्या आजीविषयी (वडिलांची आई) हा वेगळा गुणविशेष नोंदवला आहे. असेच एक मुलखावेगळे व्यक्तिमत्त्वही ते सांगून जातात ते असे,

"त्यांच्या दिसण्यावर जाऊ नकोस, हा फार अजब माणूस आहे. त्याच्याजवळ मंत्रसिद्धी आहे. जारणमारणाचा त्याने अभ्यास केलेला आहे. मठातील स्वामी, बैरागी त्यांच्याशी त्याची ओळख आहे. रानावनात तो एकटाच राहिला आहे. पिशाच्य योनीबद्दल तो जे सांगतो ते ऐकताना अंगावर काटा उभा राहतो. आणि माणूस म्हणून हाडाचा सच्चा आणि निष्ठावंत. याच्याजवळ मनुष्यजातीचे अवघे भान आणि दानत असते. अंधारात अंतस्थ गोष्टी झगमगीत समजू लागतात. मला हा माणूस मोलाचा वाटतो."[२६]

अशाच वेगळ्या विश्वामध्ये जगणाऱ्या व्यक्तिचे व्यक्तिचित्र रेखाटताना लेखक सांगतात, की अशा पद्धतीच्या व्यक्ती स्वत:च्याच विश्वामध्ये जगत असतात. त्यांना समाजाचे फारसे देणेघेणे नसते. आपलेच विश्व त्यांना माहीत असते. असेच एक व्यक्तिचित्रण रेखाटतांना ते लिहितात.

"त्यांची वामनमूर्ती कुणाच्या सहसा ध्यानात येत नसे. रस्त्याने जाताना देखील ते स्वत:शीच काहीतरी पुटपुटत, हातवारे करीत जात. त्यांचा हिरव्या रंगाचा, पितळेच्या बटनांचा डबल ब्रेस्टचा एक कोट होता. माझ्या उभ्या आयुष्यात इतके अद्वितीय दुसरे कुणी गृहस्थ मला भेटले नाहीत."[२७]

तर काही व्यक्तिंच्या स्वभावातून लेखकांना त्यांचा विचित्र स्वभाव आढळून आला. अशा विचित्र स्वभावापैकी एक प्रा. एस. एन. जोशी यांचे होय. या जोशीविषयी, त्यांच्या

व्यक्तिमत्त्वाविषयी लिहिण्याचा मोह मला अनावर होतो असे स्वत: म.द. हातकणंगलेकर प्रांजळपणे नमुद करतात. ते लिहितात,

''अखेरीस आमचे प्रा. एस. एन.जोशी यांच्यावर विस्ताराने लिहिण्याचा मोह होतो. इंग्रजीत ज्यांना कॅरॅक्टर किंवा कोल्हापूरी भाषेत ज्यांना 'नग' म्हणता येईल असे ते गोरे, हिरव्या डोळ्याचे, आडमाप बांध्याचे गृहस्थ होते. त्यांच्या केवळ आठवणीने धारवाडचे धुके विरळ होते.''[२८] अशा व्यक्तिचित्रणामध्ये एकप्रकारची नर्मविनोदाची छटाही दिसून येते.

अशाप्रकारे प्रत्यक्ष जीवनामध्ये अनुभवलेल्या व्यक्तिंच्या व्यक्तिरेखा म.द. हातकणंगलेकरांनी आपल्या ओघवत्या व मिस्कील भाषाशैलीतून रेखाटल्या आहेत. ही व्यक्तिचित्रे त्यांच्या गुण-दोषासहीत त्यांच्या स्वभावातील बारकाव्यासहीत हातकणंगलेकर आपणासमोर चित्रीत करतात. हे त्यांच्या लेखनाचे वैशिष्ट्य व वेगळेपण म्हणावे लागेल.

## ४.५ 'उघडझाप' मधील प्रसंगचित्रण

म. द. हातकणंगलेकर ज्याप्रमाणे व्यक्तिरेखा वाचकासमोर उभ्या करतात, त्याप्रमाणेच एखादा प्रसंगही ते वाचकाच्या डोळ्यासमोर जिवंत साकारतात. असे प्रसंग साक्षात उभा करण्याचे वैशिष्ट्य त्यांच्या लेखनशैलीत सामावलेले आहे. वेळोवेळी त्यांनी त्यांच्या जीवनामध्ये प्रत्यक्ष अनुभवलेले प्रसंग लेखक 'उघडझाप' या ग्रंथातून वाचकासमोर साकारतात. मग तो 'चांदणी भोजनाचा' प्रसंग असेल अगर 'पुस्तकांच्या चोरीचा प्रसंग' असेल, 'आजारपणातील अनुभव' असतील किंवा 'जीवनातील गंभीरतेकडे दुर्लक्ष करून जगणाऱ्यांचे बेदरकार जीवन' असेल. या व यासारख्या त्यांच्या व त्यांच्या सुहृदांच्या जीवनामध्ये आलेल्या प्रसंगाचे वर्णन ते अतिशय नाट्यमय पद्धतीने मोजक्याच शब्दात रंगवून सांगतात. अशा प्रसंगाचे चित्रण करताना त्यांच्या लेखनशैलीला अतिशयोक्तीची गरज भासत नाही. किंवा अशा प्रसंगाचे वास्तव चित्रण रेखाटतांना त्यांची शैली कुठेही घसरत नाही. हेच त्यांच्या लेखनाचे वैशिष्ट्य आहे, असे म्हणता येते. म.द. हातकणंगलेकरांच्या लेखनाला गुणवत्ता प्राप्त करून देणारा आणखी एक विशेष म्हणजे त्या प्रसंगाचा तपशील सुत्रबद्धतेने व मार्मिकपणे ते मांडतात. यामुळे वाचकाच्या अंत:करणाला तो प्रसंग भिडतो. मग तो प्रसंग स्वत: लेखकांच्या जीवनामध्ये घडलेला का असेना? ते तो प्रसंग प्रांजळपणे चित्रित करताना ते लिहितात,

लहानपणी पुस्तकाच्या आवडीमुळे आपल्या हातून कशी चूक घडली. याची माहिती लेखक देतात. आपल्या हातून घडलेल्या त्या प्रसंगाचे चित्रण करताना त्यांची लेखनी कुठेही कचरत नाही. म. द. हातकणंगलेकरांना बालपणापासून वाचनाची आवड होती. ही आपली वाचनाची आवड पूर्ण करण्यासाठी ज्या शिक्षकाकडे ते शिकवणीसाठी जात होते. तेव्हा त्यांच्याच कपाटातील एक पुस्तक त्यांनी चोरून घरी नेले. काही दिवसानंतर ती गोष्ट सरांच्या लक्षात आली, हे लेखकांना समजले. तेव्हा त्यांच्या मनाची जी अवस्था झाली ते सांगताना ते लिहितात,

''मला घाट्यांचे, नाना देशाचे, नाना लोक' पुस्तक फार आवडले होते. मी ते मास्तरांना न विचारता घरी नेले. वाड्यात गडबड उडाली. पुस्तक कुणी नेले ! मला ते परत द्यायचे होते; पण कसे द्यायचे? माझ्या एका मित्राने चुगली केली. मास्तरांना सांगितले, मी पुस्तक चोरले म्हणून हे कळल्यावर मी मुकाट्याने पुस्तक मास्तरांना नेऊन दिले. मला काही बोलता येईना. मास्तरांनी माझ्या पाठीवरून हात फिरवला. म्हणाले, ''तुला जे आवडेल ते मला सांगून नेत जा'' मास्तरांचा पोरांवर इतका जीव का होता? नंतर मला कळले, की मास्तरांना स्वत:चे मुलबाळ नव्हते !'' [२९]

बालपण आणि आकाशातील चंद्र व चांदणे यांचे एक अतुट नाते अजानतेपणी निर्माण झालेले असते. संध्याकाळच्या वेळी असणारी निरव शांतता, संध्याकाळच्या त्या शांतवेळी, मंद अशा वाहाणाऱ्या वाऱ्याच्या सोबत जेवणाचा आस्वाद हा प्रत्येकांनी आपल्या बालपणी अनुभवलेला असतो. त्याची गोडी काही औरच. जी गोडी आजही लेखकाच्या जिभेवर रेंगाळत आहे. त्या प्रसंगाचे त्यांनी जिवंत असे चित्रण केले आहे.

''मग आत्ती संध्याकाळी स्वयंपाकाला बसायची, आम्ही मागच्या फरसबंदी चौकात बसायचो. तिथेच चांदण्याच्या मंद प्रकाशात ताटे मांडली जायची. गरम भाकरीशेजारी लसून लावलेली पालेभाजी, कारल्याची चटणी, कवडीचे दही असायचे. त्या जेवणाची चव इतक्या वर्षानंतरही जिभेवर अवतरते. '' [३०]

असाच तृप्त करून सोडणारा जेवणाचा वेगळा अनुभव म.द. हातकणंगलेकरांना आजीच्या हातचे खातानाही येत असे.

''आमच्या घराचे दोन भाग होते. पाठीमागे स्वयंपाक घर, पाण्याचा आड, जनावरांचा

गोठा आणि मधल्या जागेत फरसबंदी चौक. उन्हे कलायला सुरूवात झाल्यापासून माझा मुक्काम या उबदार फरशीवर असायचा. मग संध्याकाळच्या स्वयंपाकाची चाहूल आजी ताज्या पालेभाजीला फोडणी देऊन, गरम भाकरी, तिखट, दही असे ताट करून मला या फरशीवर जेवण द्यायची. झुंझरक्या चंद्रप्रकाशात या अन्नाला अवीट गोडी प्राप्त होत असे. सोन्याचा घास म्हणतात तो हाच ! त्यानंतर आयुष्यात तऱ्हेतऱ्हेचे पदार्थ चाखले पण बालपणातल्या या भाजी भाकरीची चव विसरता आली नाही.'' ३१

अशा स्वयंपाकातील चवीची माहिती देताना या अनुभवाला साजेसा व्यंकटेश माडगुळकरांच्या एका कथेतील प्रसंगाचा दाखलाही त्यांनी दिला आहे. शिकारीला गेले असता ते एका पारध्याच्या पालावर संध्याकाळच्या वेळेस पोहचतात. रात्रीचे जेवण तव्यावर तयार होत असते. कोणतातरी पक्षी भाजला जात असतो. त्याचा खमंग वास सुटलेला. ''काय शिजवता?'' माडगूळकर विचारतात, ''गिधाड गावलं मालक!'' ''काय तुम्ही गिधाडदेखील खाता?'' ''तर काय, फार चवदार असतं मालक, उलिसं तेल घालून, लसून टाकून भाजला तर अक्षी चवदार!'' लहानपणातल्या माझ्या जेवणाची अशीच रूची असावी पदार्थ वेगळा पण अनुभव तसाच.'' ३२

लेखक म. द. हातकणंगलेकर ताकारीला असताना एकदा आजारी पडले. तो त्यांचा आजार म्हणजे त्यांचा पुर्नजन्मच म्हणावा लागेल. तो प्रसंग त्यांनी अतिशय भावूकपणे चित्रित केलेला आहे.

''ताकारीला असताना थंडीतापानं मी जाम आजारी पडलो. सारखी तोंडाला कोरड पडायची पण पाणी प्यायचं नव्हतं, थंडी वाजायची. तापानं अंगाची लाही होत असे. गावठी औषधं चालू होती. गावात शिकलेला डॉक्टर नव्हता. एकदा, घरात कुणी नव्हतं. मी घोंगडं अंगावर घेऊन होतो. घशाला कोरड पडली म्हणून पाणी पिण्यासाठी उठलो तर समोर ताकाची कासंडी दिसली. तशीच उचलली आणि तोंडाला लावली. मोकळी करूनच खाली ठेवली. घसा थंड झाला. जरा वेळात इतकी थंडी भरली की अंग थडाथड उडू लागलं. माणसं आली. त्यांनी आणखी होती, नव्हती तेवढी पांघरूणं घातली पण थडथडायचं आणि वर उडायचं थांबेना. पांघरूणावर दोन-तीन माणसं बसली. तरी माझं अंग काही भुईला ठरेना. घरच्यांनी माझी आशा सोडली. त्यातून वाचलो आणि थोड्या दिवसांत मी हिंडू, फिरू लागतलो. त्या वेळेपासून

आजपर्यंत कसल्याच आजाराचं नाव नाही बघा."[३३]

हा आजारपणातील प्रसंग वाचत असताना वाचकांच्या मनामध्ये भय निर्माण होते, त्याबरोबरच उत्कंठताही निर्माण होते, की आता या व्यक्तिचे काय होणार? या आजारातून बाहेर येणार, की?... पण अखेरीस 'थोड्या दिवसांनी मी हिंडू फिरू लागलो' हे वाक्य वाचताच वाचकास आपल्या माणसाच्या वाचण्याचे प्रत्ययकारी समाधान देऊन जाते.

पतिपत्नीचे नाते हा एक ऋणानुबंध असतो, आणि वाढत्या वयाबरोबर तो अधिकाधिक दृढ होत जातो. जीवनाच्या प्रवासामध्ये जर आपला जोडीदार संसाराचा डाव अर्ध्यावरती सोडून निघून गेला तर ते दु:ख फारच हृदयद्रावक असते. असाच एक प्रसंग म.द. हातकणंगलेकरांनी या लेखात सांगितला आहे. 'एका वृद्ध जोडप्यातील बायकोचा मृत्यू झाल्यावर त्या म्हाताऱ्याचा शोक अनावर होतो. त्याचेच हृदयद्रावक वर्णन म.द. हातकणंगलेकरांनी केले आहे ते असे,

"म्हाताऱ्या माणसाचे आपल्या बायकोवर अतिप्रेम होते. ती देखील त्यांची फार काळजी घ्यायची. संध्याकाळी ते घरात आले की तांब्याभर गरम पाणी त्यांचे पाय धुण्यासाठी ठेवायची, त्यांच्या तोंडात दात नसल्यामुळे डिचकीभर गरम भात, दूध, गुळाचा खडा असे जेवण वाढायची. दिवसभर ते दोघे एकमेकाभोवती कबुतरासारखे फिरत राहायचे. असले निखळ प्रेम मी तोपर्यंत पाहिले नव्हते. पुढे एकाएकी या बाई वारल्या. म्हाताऱ्याला अतोनात दु:ख झाले. ती गेली यावर त्याचा विश्वास बसेना. सैरभैर होऊन तो सगळ्या शेजारपाजाऱ्यांच्या घरात जाऊन "आमची बायको आली काय?" असे विचारू लागला. "नाही" म्हटल्यावर "कुठे गेली असेल?" असे म्हणू लागला. "मला सांगितल्याशिवाय जाणार नाही, आताच कशी गेली?" म्हाताऱ्याचे खाणेपिणे कमी झाले आणि अखेरीस बायकोच्या शोधात त्याने घर सोडले. आजही विरहदु:खाने वेडापिसा झालेला त्याचा चेहरा माझ्या दृष्टीसमोर येतो." [३४]

एखादा प्रसंग चित्रासारखा वाचकांसमोर उभा करणे म.द. हातकणंगलेकरांच्या लेखणीचे वैशिष्ट्य आहे. कोणत्याही प्रसंगाच्या बाह्य वर्णनापर्यंत वाचकांना घेऊन जाता जाता त्यांच्या अंतरंगाची प्रचिती ते वाचकांना करून देतात. असाच एक प्रसंग त्यांनी 'आत्ती' या व्यक्तिरेखाच्या माध्यमातून वाचकांसमोर उभा केलेला आहे. लेखकाच्या बालपणी त्यांच्या वडिलांचा घातपाती

मृत्यू झाल्यानंतर त्यांची आत्त्या म्हणजे वडिलांची बहीण कसा शोक करते त्याचे वर्णन म.द. हातकणंगलेकरांनी हृदयद्रावकपणे शब्दबद्ध केलेले आहे.

''आत्ती धाय मोकलून रडत होती, मोठमोठ्याने ओरडत होती, ''माझ्या बाबा, आता मी तुला कुठं रे पाहू? असा कसा वाद्यानं डाव साधला? किती वर्षांची आपली जोडी अशी कशी देवानं ताटातून केली? कधीतरी आपण एकमेकांना विसरत होतो का दत्ता, आता मी कुठं रं जाऊ? आता मला हिरा म्हणून कोण हाक मारणार? आता मी शेतात कुणाच्या वाटंकडं डोळं लावणार?'' असे म्हणून ती हाताने भुई घासत होती, कपाळ, छाती बडवून घेत होती.'' [३५]

शोकात्म प्रसंगाचे वेगवेगळ्या प्रकारचे चित्रमय, हृदयस्पर्शी चित्रण फक्त म.द. हातकणंगलेकरच करू शकतात, याचे हे एक उत्तम उदाहरण म्हणता येईल.

म.द. हातकणंगलेकरांच्या लेखनाला गुणवत्तेची समृद्धी प्राप्त करून देणारी घटना म्हणजे व्यक्तिंच्या जगण्यातील बारकावे व त्यावरून त्या माणसाच्या स्वभावाचे वर्णन करणे ही लेखकाची वैशिष्ट्य होय. अगदी छोटासा प्रसंग जरी असला तरी त्याचे बारकावे त्यांच्या नजरेतून सुटत नाहीत. बेळगावमधील एक प्रसंग त्यांनी सांगितला आहे.

''त्यांच्या खोलीत एकच कॉट होती. थंडी होतीच. त्याने माझी व्यवस्था केल्यानंतर मी त्याला म्हटले, ''तू कुठं झोपणार?'' त्याच्याकडे एक मोठा टेबल होता. तो म्हणाला, ''हा माझा प्रशस्त बेड'' तो चणीने लहान असल्याने त्याला तो ऐसपैस झाला. डास होतेच. त्याचे काय असे विचारल्यावर तो म्हणाला, ''माझ्याकडे दुसरी मच्छरदानी आहे, ती काही लावता येणार नाही. तींच पांघरून मी झोपेन.'' त्याला पहाटे झोप लागली असावी. मी लवकर जागा झालो. चहाचे चिन्ह दिसेना. वाट पाहून त्याला हाक दिली. ''कॅन्टिनच्या पोराला बोलाव.'' असे तो म्हणाला. मी बोलावले. चहा सांगितला. काही वेळाने तो आला. तोपर्यंत बाहेरच्या नळाला मी तोंड स्वच्छ करून आलो होतो. त्याला म्हटले, ''चहा आला आहे. तोंड स्वच्छ करून ये.'' तो म्हणाला, 'दे माझा कप'' त्याने पांघरून बाजूला करून उघड्या दारातून चहानेच चूळ भरली आणि उरलेला चहा पिऊन पुन्हा मुस्कट मारली. असा तो बिनधास्त होता.''[३६]

अशा बिनधास्त जीवन जगणाऱ्या व्यक्तिंच्या वर्णनाबरोबर मनाच्या गाभाऱ्यामध्ये खोलवर असणाऱ्या शारीरिक आकर्षणाच्या मानवी वासनेच्या भावना या गोष्टीवरही त्यांनी आपल्या

लेखनाच्याद्वारे प्रकाश टाकलेला आहे. या गोष्टी वर्णन करतांना म.द. हातकणंगलेकरांच्या स्वभावातील असणारा बुजरेपणा लेखणातील वर्णनामध्ये मात्र आढळून येत नाही. हेच त्यांचे वेगळेपण म्हणता येईल. आपल्या मनातील लैंगिकतेची भूक शमवण्यासाठी घडलेल्या प्रसंगाचे ते वर्णन करतात.

"वसतिगृहावर एक चमत्कारिक प्रकार सुरू झाला. मुलींचे कपडे बाहेर सुकत घातलेले असत. त्यातली अंर्तवस्त्रेच गायब होऊ लागली. मोलकरणीच्यावर आळ घेतले गेले. पण काही सिद्ध झाले नाही. शेवटी या मुलीच्या खोलीवर ते सर्व कपडे सापडले आणि बरीच खळबळ माजली. ती श्रीमंत घराण्यातली मुलगी. तिने असे का करावे याचा कुणालाच उलगडा झाला नाही. त्यावेळी मी फ्राईड व हॅवेलॉक एलिसची पुस्तके वाचत होतो. त्यात Kleptomania या नावाचा एक चोरीचा प्रकार वर्णन केलेला होता. या प्रकारात चोरी ही लैंगिक उत्तेजन शमवण्याचा एक मार्ग असतो, असे म्हटले होते."[३७]

आणखी असाच एक प्रसंग कोल्हापूरचा... "शिंदे नावाचा मुलगा सुटीच्या दिवशी ओढ्यावर कपडे धुण्यासाठी जाई. मला वाचत बसायला सांगे. तासाभराने ओल्या कपड्याचे पिळे खांद्यावर टाकून परत येई त्यावेळी तो स्वच्छ आणि उत्साही वाटत असे. इतर मुले म्हणत तो ओढ्यावर केवळ आंघोळीला जात नसे तर तेथे ठरावीक वेळी धुणे धुण्यासाठी आणि आंघोळ करण्यासाठी येणाऱ्या एका मुलीला भेटण्यासाठी जात असतो. एकदा त्या दोघांना तिथे पकडले होते. हे ऐकून माझ्या मनात कादंबरीत वर्णन केलेल्या प्रसंगासारखी अनेक चित्रे सरमिसळ होऊन उभी राहत."[३८]

एखादी व्यक्ती जर अनोळखी ठिकाणी आणि त्यामध्येच ती एकटी असेल व आपला ओळखीचा येणारा माणूस दिसत नसेल तर त्याच्या मनाची झालेली अवस्था अवर्णनिय असते. त्याप्रसंगामुळे झालेली मनाची अवस्था व्यक्त करता येत नाही. अशाच व्यक्त न करता येणाऱ्या प्रसंगाला म. द. हातकणंगलेकरांना सामारे जावे लागले. तो प्रसंग आपणासमोर उभा करतात.

"सकाळी सामान घेऊन मिरजेच्या गाडीत बसलो. वळकटी, ट्रंक, बादली, स्टोव्ह, पिशव्या असे वेडेवाकडे सामान होते. पुस्तकाचा गठ्ठा तर होताच मनातून धाकधूक होती. संध्याकाळी पाच वाजता धारवाड स्टेशनला गाडी थांबली. हातकणंगल्याच्या स्टेशनासारखे

स्टेशन वाटले. फलाटावर फार गर्दी नाही. नळाचे दांडके, सिमेंटचा बाक, काळ्या लोखंडी पट्ट्यांचे कंपौंड, हमाल दिसेना. मीच बरेच सामान खाली घेतल्यावर एक जण आला. त्याने दोन खेपा करून सामान स्टेशनाबाहेर आणले. जी.ए. कुठे दिसेनात. मी चिंतेत पडलो. तोपर्यंत स्टेशनाजवळचा चढ चढून सायकलवर येताना जी.ए. दिसले. ''उशीर झाला. गाडीची वेळ नीट कळली नाही.'' असे म्हणाले. टांग्यात सामान भरून निघालो.''[३९]

आपण व्यसनाच्या दारापर्यंत कसे पोहोचलो गेलो व अशा व्यसनामध्येच आपणास सिगारेटचे व्यसन कसे जडले. त्याचीही हकिकत त्यांनी प्रांजळपणाने कथन केलेले आहे.

''सिगारेट ओढणारा एक श्रीमंत घरातील मुलगा माझ्या खोलीत आला तेव्हा मी होस्टेल सुपरिटेंडेंट होतो. मला म्हणाला, ''सर, माफ करा पण तुम्ही आमच्यापेक्षा मोठे झालेले असून अजुनी साधी सिगारेट ओढत नाही हे आम्हाला बरे वाटत नाही. आम्ही गुन्हा करतो असे वाटते. हा डबा मी आणला आहे. तो फळीवर ठेवून जातो.'' असे म्हणून ५५५ चा टिन वरच्या फळीवर ठेवून तो निघून गेला. या सिगारेटची चव मात्र मला आवडली.'' [४०]

लेखक म. द. हातकणंगलेकर आपल्या मित्रासोबत परदेशी म्हणजे इंग्लंडला गेले होते. तेथे त्यांना दिसून येणारी परदेशी संस्कृतीचे दर्शन भारतीय संस्कृतीपेक्षा कसे निराळे होते हे नकळतपणे काही प्रसंगाच्या माध्यमातून आपणासमोर उभे करतात.

''आम्ही आत जाऊन बाकावर बसलो. पुन्हा तुरळक माणसे, त्यांत एकसारख्या सिगरेट ओढतं फिरणाऱ्या मुली, तोकड्या कपड्यातल्या. त्यांना सोडायला आलेल्या तरूणांच्या गळ्याभोवती हात वेढून, चुंबनअलिंगनात रमलेल्या. हे दृष्य मला इंग्लंड व युरोपात वारंवार दिसणार होते. त्याकडे दुर्लक्ष करण्याइतका मी त्याला सरावणार होतो.'' [४१]

म.द. हातकणंगलेकरांच्या लेखनाला गुणवत्ता प्राप्त करून देणारी गोष्ट म्हणजे त्यांच्याजवळ असणारी विलक्षण तरल संवेदनशीलता. व ती व्यक्त करण्यासाठी त्याच्या ठिकाणी असलेली भाषेची अपूर्व क्षमता. भाषेच्या माध्यमातून जे प्रसंग रेखाटतात ते वाचकांच्या अंतक:करणापर्यंत पोहचते.

अशा विविध संवेदना आपल्या लेखन सामर्थ्याच्या जोरावर वाचकांच्या प्रत्ययाला आणून देणारे अनन्यसाधारण सामर्थ्य हातकणंगलेकरांच्या शब्दामध्ये आहे.

## ४.६ 'उघडझाप' मधील विनोद

म. द. हातकणंगलेकरांचे मितभाषीय गंभीर, शांत असे व्यक्तिमत्व असले तरीही, त्यांचा स्वभाव फार कोरडा, अलिप्त नाही. आपल्या जीवनाचा जीवनपट ते मिस्किल, विनोदी, भाषेतूनही मांडताना दिसतात. जीवनातील छोट्या-मोठ्या प्रसंगाच्या माध्यमातून निर्माण होणारे हे विनोद आहेत. व्यक्तिच्या स्वभावातून, वागण्यातून, बोलण्यातून अनाहूतपणे ते निर्माण करतात. हेच त्यांच्या लेखन शैलीचे वेगळेपण म्हणता येईल. कोल्हापूरच्या प्रिन्सिपॉलचा एक किस्सा त्यांनी सांगितला आहे.

"साहेबांच्या मराठीची एक कथा नेहमी सांगितली जात असे. ती ऐकून सर्वजण मोठमोठ्याने हसत. साहेबाला नीट मराठी येत नाही. त्याबाबतीत आपण साहेबापेक्षा श्रेष्ठ आहोत असे सर्वांना वाटे. एकदा पोष्टात पत्रे टाकण्यासाठी साहेब निघाले होते. तो त्यांना समोर गडी दिसला. "रामा इकडे ये." असे त्यांनी बोलावले. "काय साहेब !" म्हणून तो हात जोडून उभा राहिला. साहेब म्हणाले, " रामा, हे पत्र घेऊन पळून जा !" रामाच्या ध्यानात येईना. तो तसाच उभा राहिला. साहेबाला आश्चर्य वाटले. "अरे रामा, हेपत्र घेऊन तू पळून जायेल नाही?" तो म्हणाला, "साहेब मी कशापायी पळून जाऊ, माझ्या हातून तसं घडायचं नाही." काय मी सांगतो तू पळून जायेल नाही?" "नाही साहेब !" काही वेळ अशी झटापट झाल्यावर त्या गड्याच्या ध्यानात आले की, साहेब आपल्याला पळत जाऊन पोस्टात टपाल टाकायला सांगत आहेत. ही गोष्ट वारंवार सांगून मुले खदाखदा हसत असत." [४२]

असाच आणखी एक विनोदी किस्सा म. द. हातकणंगलेकर सांगतात, ...

"एकदा आमच्या जिमखान्याचे जे प्राध्यापक चेअरमन होते. त्यांना कुणीतरी सांगितले की, "या मुलीचं वक्तृत्व केवळ मराठी नव्हे, तर इंग्रजीही फार उत्तम आहे." तेव्हा ते म्हणाले, " हो इंग्रजी वक्तृत्वही चांगले आहे. पण बोलताना ती फार स्पेलिंग मिस्टेक्स करते." [४३] हा अफलातून जोक म्हणून खाजगी वर्तुळात सांगितला जात असे.

अशीच एक आठवण प्रा. एस. एन. जोशी यांच्या विषयी आहे. त्याविषयी लेखक सांगतात, की प्रा. एस. एन. जोशी सर मराठी बोलतांना नको तेवढा इंग्रजी शब्दाचा वापर करायचे. ती त्यांची सवयच बनून राहिलेली होती. मात्र या दोन भाषेच्या सरमिसळ झाल्याने

निर्माण होणाऱ्या अर्थामुळे हस्याचे फवारे उडले जायचे. असाच एक विनोदी प्रसंग म.द. हातकणंगलेकर सांगतात,

"प्रा. एस. एन. जोशी. दररोज काही तरी विनोदी बातमी घेऊन येत असे. एके दिवशी आल्या आल्या त्याने सांगितले, "देअर इज ए न्यू मराठी पिक्चर रनिंग इन द सिटी, इट इज कॉल्ड 'वहिनीच्या भानगड्या' ते नाव इंग्रजीत लिहिले होते. नाव होते. 'वहिनीच्या बांगड्या'. पुन्हा एकदा सांगत आला, 'दे हॅव अपॉटेंड प्रकाशन ॲज गव्हर्नर इन द अंधारा प्रदेश'. एकदा आम्ही गावातून हिंडत चाललो होतो. शेजारच्या इमारतीतून पेटी वाजण्याचे स्वर आले. मी विचारले, "हे काय नवीन?" तसे तो म्हणाला, " ही इज आवर न्यू गायनॉकॉलजिस्ट." [४४]

अशा या इंग्रजीच्या टोंनिंगवर मराठी बोलल्यामुळे त्याच्या शब्दातील अर्थामध्ये होणारे बदल, व त्या अर्थाच्या बदलामुळे निर्माण होणारे हास्य लेखकांनी फारच मार्मिकतेने प्रकट केले आहे.

प्रत्येक व्यक्तिचे बोलणे हे सरळ अर्थ व्यक्त करणारे असेलच असे नाही. कधी-कधी अशा बोलण्यामध्ये खोचकपणा असतो. या खोचक बोलण्याच्या सवयीमुळे 'श्लेष' अलंकाराची निर्मिती होऊन वाचकास मनमुराद हास्याचा अनुभव देऊन जाते. अशीच एक व्यक्ती लेखकांना भेटली. त्या व्यक्तिच्या बोलण्यातील खोचकपणा म.द. हातकणंगलेकरांनी आपल्या 'उघडझाप' या ग्रंथामध्ये नमूद केलेले आहे.

'या दुकानाजवळ दुसरे एक परटाचे दुकान होते. तिथला बंडू नावाचा एक गोंडस चेहऱ्याचा मुलगा होता. त्याने गावातल्या नाटकात स्त्री-भूमिका केली होती. शिंप्याच्या दुकानातील माणसे कधीतरी त्याला बोलावत आणि त्यांचे गालगुच्चे घेत असत. भलतेच चेकाळल्यासारखी वागत. पुढे या मुलाचे त्याच्या बापाने लग्न केले. तेव्हा तो एक हसण्याचा विषय झाला. लोक म्हणत, 'या मुलाला लग्नाचा काय उपयोग? झाला तर बापाला होणार.' [४५]

लेखकांच्या वडीलांना शेती व्यवसायाचा छंद होता. शेतातील कामासाठी वर्षाच्या बोलीने बैत्यानं गडी ठेवले जायचे. त्या बैत्याचे जेवण आत्तीला करावे लागे. कष्टाचे काम असल्याने बैत्याची भूक मोठी असायची. अशाच एका बैत्यानं ठेवलेल्या गड्याचा प्रसंग, म.द. हातकणंगलेकरांनी अतिशय गमतीने वर्णन केलेला आहे. वडिलांनी आणलेला गड्याचा आहार

फार मोठा निघाला. त्याचे जेवण करेपर्यंत आत्ती दमून जायची. एकदा आत्ती त्याला म्हणाली, "किती खातोस, माणूस की बकासूर, थांब एकदा त्याची खोडच मोडतो. 'मावशी तुमच्या आमटीला भारी चव असते बघा' म्हणतो. आता बघू देच त्याला चव! म्हणून तिने भाजी, आमटीत भरमसाठ चटणी घातली. गड्याचे तोंड भगभगून गेले. 'मावशी माझी भूक मेलीच बघा आज!' असे तो म्हणाला. आणि काही दिवसातच आमच्याकडचे काम सोडून निघून गेला." [४६]

अशा छोट्या छोट्या प्रसंगातून, किस्स्यातून म.द. हातकणंगलेकरांच्या मिस्किल स्वभावाचे दर्शन घडते.

## ४.७ 'उघडझाप' मधील काव्य दर्शन

म.द. हातकणंगलेकरांचे शिक्षक श्री. शं. गो. गोखले यांनी भा. रा. तांबे यांच्या 'गूढवादी' कवितेवर अतिशय सुरेख असा लेख लिहिला होता. त्या लेखामध्ये गोखले यांनी लिहिलेल्या काही ओळी हातकणंगलेकरांना आजही आठवतात.तांबेच्या कवितेविषयी गोखले सांगतात की,

'प्रकाशभाषा तुझी मधुर ती
गोंधळ उडवी इतरा चित्ती
गमेल मज ती सुंदर रीती
प्रलयमेघ गर्जल तरी' [४७]

लेखकांचे वडील दत्तभक्त होते. ते नियमितपणे सकाळ-संध्याकाळ देवपूजा करीत होते. ते दत्तभक्त असले तरीही त्यांचे दोन मुस्लिम गुरू होते. त्यांच्या वडिलांनी काही पद्य रचना केलेली आहे. त्यांनी केलेल्या या पद्यरचनेमध्ये मराठी-हिंदी अशा दोन्ही भाषेतील शब्दांची संमिश्र रचना येते. या मराठी -हिंदी संमिश्र काव्यरचनेमधून त्यांच्या वडिलांनी माणसातील एकीचा भाव समाजासमोर ठेवलेला आहे.त्यांनी दिलेला हा विचार लेखक अखंडपणे प्रवाहासारखे तेवत ठेवतात. वडिलांच्या कवितेची रचना त्यांना आजही आठवते, ते लिहितात,

'बाजार उठा जाता है
कुछ लेना हो तो ले लेव तुम
माझे माझे म्हणुनी ओझे
शिरी वाहसी चिंता

टाकुनि सारे पाठिमागे
स्वीकारसि तू चिंता
सगेसोयरे तुला वाटती
स्वर्ग सुखाचा ठेवा
येसी तैसा जासि एकटा
म्हणुनी आठव देवा... [४८]

मानवाला परमेश्वराची आठवण करून देणारी ही कविता आहे. ती आजच्या काळातही मानवजातीस सामाजिक ऐक्य जोपासण्यास मदत करेल, असे वाटते.

कोल्हापूरच्या ख्रिश्चन शाळेत म.द. हातकणंगलेकर शिक्षण घेत असताना, त्या शाळेचे प्रिन्सिपॉल एक अमेरिकन गृहस्थ होते. ते अमेरिकन असले तरी त्यांच्या मनामध्ये मराठी भाषेविषयी नितांत आदर, प्रेमभाव सामावलेला होता. एकदा या अमेरिकन प्रिन्सिपालांनी मराठी भाषेत एक कविता निर्माण केलेली होती. या कवितेचा विषय होता 'चिमणी'. चिमणी सारख्या चिमुकल्या विषयावरती ही कविता लिहिली असली तरी त्याचा त्यांना अभिमान वाटत होता. कारण ती मराठीतून लिहिली आहे. ती कविता वारंवार ते विद्यार्थ्यांना वाचून दाखवत असत.

'चिमणी सुखी रमणी
गेली उडोणी' [४९]

म. द. हातकणंकलेकरांनी ग्रंथसमाप्तीला कविवर्य भा. रा. तांबे यांच्या सुप्रसिद्ध भाव मधूर गीताची मोडतोड करीत आपल्या आयुष्याच्या संध्याकालीन रंगाविषयी म्हटले आहे.

'ढळला रे दिनसखया ढळला,
संध्याछाया-भिववत नाहीत,
दिसतात मात्र!' [५०]

'संध्याछाया मला भीती घालत नाहीत तर त्या डोळ्याला दिसताहेत...' मृत्यूकडे पाहण्याची ही निर्भय तटस्थ वृत्ती हा हातकणंगलेकरांच्या व्यक्तिमत्वातील एक सुंदर गुण आहे.

## ४.८ 'उघडझाप' मधील भाषाशैली

म. द. हातकणंगलेकरांनी आपल्या 'उघडझाप' ग्रंथामध्ये निरर्थक शब्द, अकारण

पाल्हाळीकपणा कुठेच आढळत नाही. हेच म. द. हातकणंगलेकर यांच्या एकूणच लेखनाचे वैशिष्ट्य आहे. ओढून ताणून सौंदर्य प्राप्त होण्यासाठी त्यांची भाषाशैली कुठे झुकलेली आहे असे दिसून येत नाही. या खोट्या प्रतिष्ठेच्या गोष्टीपासून त्यांची भाषा अलिप्त आहे. आपले लेखन दर्जेदार, वजनदार बनावे. वाचकांना ते मोहीत करावे यासाठी त्यांना अलंकारिक शब्दांच्या कुबड्याची आवश्यकता भासली नाही. त्याचा त्यांना कधी हव्यास करावा लागलेला नाही. अशी काही भाषाशैलीची सुंदर लेणी उदाहरणादाखल उघडझाप या ग्रंथामध्ये जी दिसून येतात ती नमुने म्हणून आपणास देता येतील.

''सावलीच्या तुकड्याप्रमाणे हलणारी जनावरे आणि या सर्वावर विसावलेले पांढरे ठिपकेदार ढग दाखवणारे निवान्त आभाळ. यामुळे या परिसराला विश्रब्धतेचे गूढ वलय टाकल्यासारखे वाटत आहे.'[५१]

असे निश्चल निसर्गाचे वर्णन करतांना त्यांनी जे रूपक वापरले आहे. त्यांची गोडी वाचकास वेगळीच अनुभूती प्राप्त करून देते. असेच आणखी एके ठिकाणी ते 'व्यासा'च्या बद्दल लिहितात,

'व्यासाने मानवी जीवनाचा सारा पसाराच चव घेऊन पाहिला आहे. उष्टा केला आहे.'[५२]

लेखक निसर्गाच्या स्थिर स्थितीचे वर्णन करताना लिहितात, 'काळाच्या काचातून सोडवलेलाच हा हिरव्या परिसराचा निवान्त तुकडा होता.' अशी काही मोजकीच मात्र प्रत्यकारी अलंकारिक भाषेची रूपे 'उघडझाप' या ग्रंथातून वाचकासमोर उभी करतात.

## ४.९ 'उघडझाप' मधील म्हणी व वाक्प्रचारांचे दर्शन

'उघडझाप' या ग्रंथामध्ये 'म्हणी' व 'वाक्प्रचार' यांचा आशयास अनुरूप वापर झालेला आढळतो. योजलेल्या म्हणी व वाक्प्रचारामुळे लेखनास एक प्रकारचा रसरशीतपणा प्राप्त झालेला आहे. अशा शब्दप्रयोगामुळे एक वेगळेच मूल्य लिखानास प्राप्त होते. असे वाक्प्रचार किंवा म्हणी म.द. हातकणंकलेकरांनी प्रसंगाला अनुरूप असेच वापरले आहेत. त्याची काही उदाहरणे आपणास सांगता येतील, ती पुढीलप्रमाणे,

'चुगली करणे', 'पोकळी निर्माण करणे', 'गळ्याभोवती तिढा पडणे', 'दृष्टी चौफेर

असणे', 'धुडगूस घालणे', 'अंत:करणात उन्हे चमकणे', 'रूची अवर्णनीय असणे', 'घरची रया जाणे', 'भान नसणे', 'संकट गुदरणे', 'कुटुंब उध्वस्त होणे', 'कोंड्याचा भांडा करून संसार करणे', 'हास्याचे  फवारे उडणे', 'मनात घर करून राहणे', 'माणसांची डोकी पांगणे'. असे व यासारखेच काही वाक्प्रचार 'उघडझाप' या ग्रंथामध्ये आलेले आहेत. अशा आशयगर्भ वाक्प्रचाराने त्यांच्या लेखनास वेगळाच उठाव प्राप्त झालेला दिसतो. या वाक्प्रचाराने वाचकापर्यंत पोहचणारा आशय अधिक परिणामकारकरित्या पोहचण्यास मदत होते.

## ४.१० 'उघडझाप' मधील इंग्रजी भाषा वापर

म. द. हातकणंगलेकर हे इंग्रजीचे निष्णांत प्राध्यापक आहेत. इंग्रजी भाषेवर त्यांचे प्रभुत्व आहे. 'उघडझाप' मधील भाषेच्या पेरणीमुळे या ग्रंथातील आशयचा दर्जा अधिकाधिक उंचावलेला दिसतो. उदाहरणार्थ –

'Consience makes cowards of as all !'[५३]

'He is for all time'[५४]

'The buttelous disporting themselves in the woter of the pond.' [५५]

'In it but not of it.'[५६]

'No woman is old below her walst.' [५७]

'Literature is an escape from reality.'[५८]

काही इंग्रजी संभाषणही पाहाण्यासारखे आहेत,

"हू इज इट?" "रेक्टर, प्लीज ओपन द डोअर."

"वेअर यू स्मोकिंग मिस्टर देशपांडे?" यस सर ! "डोंच्यू नो दॅट स्मोकिंग इज नॉट परमिटेड हिअर?" "आय नो सर, बट आय कांट स्टडी अनलेस आय स्मोक."

"डोंट टेल मी दॅट मिस्टर देशपांडे, वुई अल्सो हॅव स्टडीड. इफ यू कांट गिव्ह अप स्मोकिंग, यू हॅव टू ! क्विट द हॉस्टेल, माइंड यू." यस सर !"[५९]

शब्दांचा योग्य व अचूक वापर हा म. द. हातकणंगलेकरांच्या लेखनशैलीचा एक अलंकार आहे.

### ४.११ सारांश

म. द. हातकणंगलेकरांची लेखनशैली सिध्दहस्त नसली ते भाष्यप्रभू नसले तरी भाषेचा अचूक व योग्य वापर, पारदर्शीपणा, रेखीवता, आणि चित्रमयता व संयत व ठोस प्रकटीकरण हे त्यांच्या लेखनाचे गुण म्हणून अभ्यासांती आपणास सांगता येतील.

★★★★★

प्रकरण चौथे

# संदर्भ


१) हातकणंगलेकर म. द. : 'उघडझाप', मौज प्रकाशन गृह, खटाववाडी, गिरगाव, प्रथमावृत्ती, १ फेब्रुवारी २००५, पृष्ठ क्र. १

२) 'उघडझाप' : पृष्ठ क्र. ५

३) 'उघडझाप' : पृष्ठ क्र. १४५

४) 'उघडझाप' : पृष्ठ क्र. १६८

५) 'उघडझाप' : पृष्ठ क्र. ६

६) 'उघडझाप' : पृष्ठ क्र. १४४

७) 'उघडझाप' : पृष्ठ क्र. ७६

८) 'उघडझाप' : पृष्ठ क्र. १३१

९) 'उघडझाप' : पृष्ठ क्र. ७३

१०) 'उघडझाप' : पृष्ठ क्र. १६६

११) 'उघडझाप' : पृष्ठ क्र. ५

१२) 'उघडझाप' : पृष्ठ क्र. ७३

१३) 'उघडझाप' : पृष्ठ क्र. २०८

१४) 'उघडझाप' : पृष्ठ क्र. १२

१५) 'उघडझाप' : पृष्ठ क्र. १४५

१६) 'उघडझाप' : पृष्ठ क्र. ३४

१७) 'उघडझाप' : पृष्ठ क्र. ४

१८) 'उघडझाप' : पृष्ठ क्र. ८२

१९) 'उघडझाप' : पृष्ठ क्र. २०८

२०) 'उघडझाप' : पृष्ठ क्र. ७८

२१) ‘उघडझाप’ : पृष्ठ क्र. ११४

२२) ‘उघडझाप’ : पृष्ठ क्र. १४५

२३) ‘उघडझाप’ : पृष्ठ क्र. ५१

२४) ‘उघडझाप’ : पृष्ठ क्र. ३

२५) ‘उघडझाप’ : पृष्ठ क्र. १५

२६) ‘उघडझाप’ : पृष्ठ क्र. १२०-२१

२७) ‘उघडझाप’ : पृष्ठ क्र. २१३

२८) ‘उघडझाप’ : पृष्ठ क्र. १४१

२९) ‘उघडझाप’ : पृष्ठ क्र. ४

३०) ‘उघडझाप’ : पृष्ठ क्र. ३८

३१) ‘उघडझाप’ : पृष्ठ क्र. २०६

३२) ‘उघडझाप’ : पृष्ठ क्र. २०६

३३) ‘उघडझाप’ : पृष्ठ क्र. ४०

३४) ‘उघडझाप’ : पृष्ठ क्र. ६०

३५) ‘उघडझाप’ : पृष्ठ क्र. ३६

३६) ‘उघडझाप’ : पृष्ठ क्र. ८७

३७) ‘उघडझाप’ : पृष्ठ क्र. ९६

३८) ‘उघडझाप’ : पृष्ठ क्र. १८२-८३

३९) ‘उघडझाप’ : पृष्ठ क्र. १३६

४०) ‘उघडझाप’ : पृष्ठ क्र. १७६

४१) ‘उघडझाप’ : पृष्ठ क्र. १६६

४२) ‘उघडझाप’ : पृष्ठ क्र. १०

४३) ‘उघडझाप’ : पृष्ठ क्र. ९५

४४) ‘उघडझाप’ : पृष्ठ क्र. १४१

४५) ‘उघडझाप’ : पृष्ठ क्र. १७९-८०

४६) 'उघडझाप' : पृष्ठ क्र. ४१

४७) 'उघडझाप' : पृष्ठ क्र. ८१

४८) 'उघडझाप' : पृष्ठ क्र. २०६-२०७

४९) 'उघडझाप' : पृष्ठ क्र. ११

५०) 'उघडझाप' : पृष्ठ क्र. २१५

५१) 'उघडझाप' : पृष्ठ क्र. १६६

५२) 'उघडझाप' : पृष्ठ क्र. ११

५३) 'उघडझाप' : पृष्ठ क्र. ५५

५४) 'उघडझाप' : पृष्ठ क्र. ५५

५५) 'उघडझाप' : पृष्ठ क्र. ५३

५६) 'उघडझाप' : पृष्ठ क्र. १६०

५७) 'उघडझाप' : पृष्ठ क्र. १६३

५८) 'उघडझाप' : पृष्ठ क्र. १८५

५९) 'उघडझाप' : पृष्ठ क्र. ५३

**********